# कार्यकारी अभियंता / डी-२ विभाग

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)**

८९-९५, रजनी महल, पहिला मजला, ताडदेव रोड, मुंबई- ४०० ०३४

ई मेल-eembrrbd2@gmail.com

**धोक्याची /निष्कासन सूचना**

जा.क्र. का. अभि./डी-२/विभा./ 1545 /२०२६

दिनांक 28/05/26

प्रति,

| | |
|---|---|
| **सर्व भाडेकरू/ रहिवाशी,** | **घरमालक,** |
| सी.एस.क्र.११९० | **श्री.भारत आर.मेहता,** |
| इमारत क्र. ४२७-ई, एम.एस.अली.रोड, | **स्टोन बिल्डिंग, चौपाटी सी फेस रोड,** |
| मुंबई. | **दादाजी धाकाजी कंपनीच्या मागे,** |
| (इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी) | **मुंबई- ४०० ००७** |
| | **(As per M. C. G. M. Record)** |

**विषय** :- उपकरप्राप्त इमारत क्र. ४२७-ई, एम.एस.अली रोड, उपकर क्र.डी-२४२६(२), अतिधोकादायक असल्याने सदर इमारत निष्कासित करुन पाडकाम हाती घेण्याकरिता इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी यांच्या वास्तव्याच्या कागदपत्रांची सत्यता पडताळणी करणेबाबत.

**संदर्भ** :-
१) या कार्यालयाचे warning / vaction notice पत्र क्र.३७०५ दिनांक ०९/०९/२०२५.
२) W.P.No.30359 of 2025
Raymond David Fernandes & Ors… Petitioners.
V/s
MHADA & Ors.
३) मा.उच्च न्यायालयाचे आदेश दिनांक १२/११/२०२५.
४) मा.उच्च न्यायालयाचे आदेश दिनांक १६/१२/२०२५.
५) या कार्यालयाचे पत्र क्र.४७९८ दिनांक १९/१२/२०२५.
६) मे.ऋषभ कर्नावत यांचे दिनांक ०७/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला संरचनात्मक परिक्षण अहवाल.
७) मा.उच्च न्यायालयाचे आदेश दिनांक १७/०१/२०२६.
८) या कार्यालयाचे warning / vaction notice पत्र क्र.२११ दिनांक २२/०१/२०२६.
९) या कार्यालयाचे warning / vaction notice पत्र क्र.१३२१ दिनांक ०६/०५/२०२६ (स्मरणपत्र-२)
१०) मंडळामार्फत सन २०२६-२७ च्या पावसाळयापुर्व सर्वेक्षणात धोकादायक घोषित करण्यात आलेली इमारत.

महोदय/ महोदया,

या कार्यालयातर्फे विषयांकित इमारतीची संरचनात्मक पाहणी करुन अहवाल सादर करण्याकरिता म्हाडाच्या पॅनेलवरील संरचनात्मक अभियंता/वास्तुशास्त्रज्ञ मे.ऋषभ कर्नावत यांची नेमणुक करण्यात आली. त्यांनी या कार्यालयास दिनांक ०७/०१/२०२६ रोजीच संदर्भाधीन पत्र क्र.६ अन्वये संरचनात्मक परिक्षण अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने विषयांकित इमारतीची वर्गवारी सी-१ म्हणजेच (Unsafe/Dangerous/Inhabitable structure/structures need to be vacated & demolished) अशी नमुद करण्यात आली आहे. सदर जाहीर सुचना इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ चिटकविण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ७७(ब) अन्वये आपणास सुचित करण्यात येते की, विषयांकित इमारतीत वास्तव्य करणे धोकादायक असून आपण आपली सदनिका तातडीने रिक्त करुन इमारत निष्कासन करावी. आपणास **केवळ निवासी** सदनिकेकरिता पर्यायी निवासस्थानासाठी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळयाची आवश्यकता असल्यास आपण या कार्यालयास खालील तक्त्यात नमुद कागदपत्रांच्या मुळ प्रती व त्यांच्या छायांकित प्रतींचे दोन संच तसेच सोबत आपली पासपोर्ट आकाराची ०८ छायाचित्रे या कार्यालयास सादर करावीत, जेणेकरुन आपणास संक्रमण शिबीरातील गाळा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरु करणे या कार्यालयास शक्य होईल.

--२/-

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| १. | भाडेपावती - दि.१३.०६.१९९६ पूर्वीची व सध्याची | सदर कागदपत्रे विषयांकित इमारतीत आपण वास्तव्यास असलेल्या गाळ्याशी संबंधित असणे आवश्यक आहे. |
| २. | शिधापत्रिका - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याची | |
| ३. | निवडणूक ओळखपत्र - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याची | |
| ४. | विद्युत देयक - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याचे | |
| ५. | दुरध्वनी देयक - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याचे | |
| ६. | आधारकार्ड व पॅनकार्ड | |
| ७. | पारपत्र / वाहन चालक परवाना, इत्यादी. | |
| ८. | इमारतीतील वास्तव्याबाबतचे इतर पुरावे | |

**उपरोक्त लिखित बाबींची पुर्तता करुन आपण आपला गाळा निष्कासीत करुन इतरत्र स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत आपले वास्तव्य सुरु ठेवलेत आणि त्या कालावधीत इमारती पडझडीचे अपघात घडून जिवित अथवा वित्तहानी झाल्यास, त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण गांभिर्याने नोंद घ्यावी.**

**संबंधित सदनिकेच्या भाडेकरू / रहिवासाचे हक्क कागदपत्र पडताळणीच्या अधिन असुन सदरचे पत्र आपणास भाडेकरू / रहिवासी हक्काचा दाखला म्हणून वापरता येणार नाही, याची आपण नोंद घ्यावी.**

आपली विश्वासू

**कार्यकारी अभियंता**

डी-२ विभाग / मुं.इ.दु व पु.मंडळ

प्रत,

- मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सविनय सादर.
- उपमुख्य अभियंता /परिमंडळ-२/ मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सविनय सादर.
- उपमुख्य अधिकारी (सं.गा.) / मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी / प्राधिकरण यांस माहितीस्तव तथा म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी रवाना.
- मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण यांस माहितीस्तव तथा सदर सुचनापत्र मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिध्द करणेकामी रवाना.
- सहाय्यक आयुक्त / डी- विभाग/ बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
- वरिष्ठ पोलीस निरीक्षक , गावदेवी पोलीस ठाणे, मुंबई यांना माहितीस्तव रवाना.
- इमारतीच्या दर्शनी भागावर चिटकविणेसाठी.
- इमारतीच्या घरमालकाची नोंद या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने नमुद करण्यात आलेली आहे.तथापि सदर नोंदीव्यतिरिक्त इमारतीच्या मालकीचे अन्य दावेदार असल्यास त्यांनी व इमारतीच्या सर्व भाडेकरु/ रहिवाशी यांनी सदर धोकाच्या सूचनेची दखल घेणेकामी या नोटीसीच्या प्रती पंचनाम्यासहीत इमारतीच्या दर्शनी भागावर चिटकविण्यात येत आहे.